## दिन विशेष...

१७९८ : सुप्रसिध्द खगोलशास्त्रज्ञ हंडरसन यांचा जन्म.
१८८५ : राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन सुरु.
१८९९ : ग.त्र्यं.माडखोलकर यांचा जन्म.
१९२६ : हुतात्मा शिरीषकुमार यांचा जन्मदिन.
१९४८ : महाराष्ट्रात कुळकायदा याच दिवशी अस्तित्वात आला.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

| सेन्सेक्स | ८५,०४१.४५ | -३६७.२५(०.४३%) |
|---|---|---|
| डॉलर | ₹ ८९.८१ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १३ |
| दिल्ली | २१ | ०८ |
| मुंबई | ३३ | २० |
| नागपूर | २७ | १२ |
| पुणे | २९ | १० |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. २८ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ४९ किंमत : ५ रु. | पाने ४

### सुविचार

प्रयत्न करत रहा; एक दिवस नशीब तुमच्या बाजूने असेल.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०३ संध्या-५:५५

### सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४१,९२५/- २,५१,०००/-

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### पद्मश्री, पद्मभूषण, भारतरत्न हे नागरी पुरस्कार उपाधी नाही

**मुंबई ।** पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण आणि भारतरत्न हे नागरी पुरस्कार उपाधी नाहीत, असा निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे ते एखाद्या व्यक्तीच्या नावापूर्वी किंवा नंतर वापरता येत नाहीत. न्यायालयाने एका याचिकेच्या केस शीर्षकात पद्मश्री शब्दाच्या वापराबद्दल हे निरीक्षण नोंदवले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. सोमशेखर सुंदरेसन यांच्या खंडपीठासमोर यासंदर्भातील याचिकेची सुनावणी सुरू होती. २००४ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झालेले डॉ. शरद मोरेश्वर हर्डीकर हे देखील एक पक्ष होते. त्यांचे नाव केस शीर्षकात पद्मश्री डॉ. शरद मोरेश्वर हर्डीकर असे सूचीबद्ध केले होते. न्यायाधीशांनी यावर आक्षेप घेत म्हटले की, हे कायद्यानुसार बेकायदेशीर आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयाने १९९५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयाचा हवाला दिला.

# मी कट्टर विरोधकच, संघाच्या 'शक्ती'चं कौतुक

## दिग्विजय सिंहांच्या पोस्टने काँग्रेसमध्ये खळबळ

वृत्तसंस्थत्त । नवी दिल्ली

**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचा एक जुना फोटो सोशल मीडियावर पोस्ट केल्याने राजकीय वर्तुळात मोठा पेच निर्माण झाला आहे. या पोस्टमध्ये त्यांनी चक्क राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपच्या संघटन कौशल्याची स्तुती केल्याने काँग्रेसमध्ये एकच खळबळ उडाली. मात्र, वाद वाढताच सिंह यांनी आपली भूमिका स्पष्ट करत सारवासारव केली आहे.**

**नेमके प्रकरण काय?**

दिग्विजय सिंह यांनी त्यांच्या 'एक्स' (ट्विटर) हँडलवर एक कृष्णधवल फोटो शेअर केला आहे. या फोटोत लालकृष्ण अडवाणी खुर्चीवर बसलेले दिसत असून,



नरेंद्र मोदी त्यांच्या पायापाशी जमिनीवर बसलेले आहेत.

हा फोटो पोस्ट करताना दिग्विजय सिंह यांनी लिहिले की, म्युवरावर मला हे चित्र सापडले. हे अत्यंत प्रभावशाली आहे. कशाप्रकारे आरएसएस चा जमिनीवर काम करणारा स्वयंसेवक आणि जनसंघाचा (भाजप) कार्यकर्ता नेत्यांच्या चरणांशी जमिनीवर बसून पुढे राज्याचा मुख्यमंत्री आणि देशाचा पंतप्रधान बनला. ही संघटनेची ताकद आहे. 'जय सिया राम'.

या पोस्टमध्ये त्यांनी राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि प्रियांका गांधी यांसारख्या वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनाही टॅग केल्याने पक्षांतर्गत वाद उफाळून आला. आपल्याच नेत्याकडून (पान २ वर)

### ➢ 'कट्टर विरोधकच राहणार'

दिग्विजय सिंह यांनी पुढे स्पष्ट केले की, जरी त्यांनी भाजपच्या संघटन शक्तीचा उल्लेख केला असला, तरी त्यांच्या विचारधारेला त्यांचा विरोध कायम आहे. मी संघटनेच्या शिस्तीचे समर्थन करतो, पण आरएसएसच्या विचारधारेचा घोर विरोधक आहे, असे सांगत त्यांनी वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. सध्या सोशल मीडियावर या पोस्टवरून जोरदार चर्चा रंगली असून भाजप समर्थकांकडून यावर संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत.

## सप्तशृंगी गड घाटात कार दरीत कोसळली; दोघांचा मृत्यू

वृत्तसंस्था । नाशिक

नाशिकमधील सप्तशृंगीगड येथील गणपती घाटात इनोव्हा कार १००० ते १२०० फुट खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. मृतांमध्ये दोन महिला व तीन पुरुषांचा समावेश आहे. अद्याप मृतदेहांची ओळख पटली नसून, मृतदेह दरीतून बाहेर काढले जात आहेत. दरम्यान सदर इनोव्हा कारमध्ये एकूण सात प्रवाशी होते. त्यापैकी पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज दुपारी सप्तशृंगी गडावर दर्शनासाठी जात असताना वाहन (एमएच १५ बीएन ०५५५) खोल दरीत कोसळून अपघात झाला. एका वाहनाला ओव्हरटेक करताना वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन कठडयाला धडकले. मात्र, कठडे कमकुवत असल्याने कार कठडे तोडून दरीत कोसळली. यात पाच जणांचा मृत्यू झाला असून अन्य दोघे जखमी झाले आहेत. या जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हे प्रवासी पिंपळगाव चिंचखेड येथील असल्याची प्राथमिक माहिती आहे.

# राहुल गांधींचा 'जी-राम-जी' कायद्याविरोधात हल्लाबोल

वृत्तसंस्था । नवीदिल्ली



### ➢ वीस वर्षांचे मनरेगा उद्धस्तकरून गरीबांवर हल्ला! राहुल गांधींचा मोदी सरकारवर आरोप

मनरेगा हा फक्त रोजगार कार्यक्रम नव्हता, तर जगभरात कौतुक मिळालेली विकास चौकट होती. हा कायदा रद्द करणे म्हणजे हक्कांशी आधारीत असलेल्या दृष्टिकोनावर आणि देशाच्या संघराज्यांच्या रचनेवर केलेला हल्ला आहे. हा कायदा म्हणजे राज्यांवर आणि गरीबांवर केलेला विनाशकारी हल्ला आहे, जो पंतप्रधानांनी नोटाबंदीप्रमाणेच एकट्याने केला.

आपल्या मंत्रीमंडळाला न विचारता, कोणत्याही गोष्टीचा अभ्यास न करता पंतप्रधानांनी मनरेगा नष्ट केले आहे, असा हल्लाबोत लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी केला. काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या (सीडब्ल्यूसी) बैठकीमध्ये मनरेगा आणि जी-राम-जी या नव्या कायद्यासंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. याचर्चेनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांच्यासह काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी माध्यमांशी संवाद साधताना, केंद्रातील भाजप सरकारवर व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तीव्र हल्लाबोल केला. पत्रकार परिषदेत बोलताना, राहुल गांधी म्हणाले की, आम्ही याला विरोध करणार आहोत. मला खात्री आहे की संपूर्ण विरोधी पक्ष आमच्यासोबत असेल, असे ते म्हणाले. त्यांनी काँग्रेसच्या 'मनरेगा बचाव अभियाना'चा उल्लेख केला, जे ५ जानेवारी रोजी देशभरात सुरू करण्याची योजना आहे. २० वर्षे जुन्या मनरेगा योजनेची जागा घेणारे 'व्हीबी-जी-राम-जी विधेयक' संसदेच्या नुकत्याच संपलेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान विरोधी पक्षांच्या जोरदार विरोधादरम्यान संसदेत मंजूर करण्यात आले. या नवीन कायद्यात ग्रामीण मजुरांसाठी १२५ दिवसांच्या मजुरीच्या रोजगाराची तरतूद आहे.

# तुरुंगातून थेट निवडणूक रिंगणात!

## बंडू आंदेकरचा अर्ज, व्हिक्ट्री साईनने शक्तीप्रदर्शन

वृत्तसंस्था । पुणे

**आतापर्यंत उत्तर प्रदेश-बिहारमध्ये पाहायला मिळणारे चित्र आता शिक्षणाचं माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातही दिसून आलं आहे.**



आयुष कोमकर हत्या प्रकरणातील आरोपी आणि आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याने थेट तुरुंगातून महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करत लोकशाहीचाच बाजार मांडला. तोंडावर काळं कापड, पोलिसांच्या दोरखंडात जखडलेला आणि कडक बंदोबस्तात आणलेला बंडू आंदेकर भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात अर्ज भरताना व्हिक्ट्री साईन दाखवत शक्तीप्रदर्शन करताना दिसून आला.

नेकी का काम, आंदेकर का नाम अशा घोषणांसह त्याने अर्ज भरण्याची एन्ट्री घेतली आणि अर्ज दाखल करतानाच स्वतः च्या प्रचाराचा नारळ फोडला. शनिवारी पोलिस बंदोबस्तात भवानी पेठ कार्यालयात आणण्यात आलेल्या आंदेकरने, बघा बघा, मला लोकशाहीत कसं आणलंय. आंदेकरांना मत म्हणजे विकासकामांना मत. मी उमेदवार आहे, दरोडेखोर नाही. वनराज आंदेकर जिंदाबाद, अशा घोषणा देत वातावरण तापवलं. सध्या आयुष कोमकर हत्या प्रकरणात तुरुंगात असलेला बंडू आंदेकर पुण्यातील प्रभाग क्रमांक २३ मधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्यात इच्छुक आहे. महापालिका निवडणुकीसाठी आंदेकर कुटुंबातील (पान २ वर)

# इंदूर रेल्वे मार्गाच्या भूसपादनास विरोध

## • शेतकरी पुन्हा रस्त्यावर



वृत्तसंस्था । मालेगाव

**मनमाड-इंदूर रेल्वे मार्गासाठी शासन पातळीवरून सुरू झालेल्या भूसंपादन प्रक्रियेस शेतकऱ्यांचा विरोध दिवसेंदिवस तीव्र होत आहे. या प्रकल्पासाठी जमिनी अधिग्रहित केल्या जाणार असलेल्या मालेगाव तालुक्यातील १६ गावांमधील शेतकरी त्या विरोधात एकवटले आहेत.**

मनमाड-इंदूर रेल्वे मार्गासाठी शासन पातळीवरून सुरू झालेल्या भूसंपादन प्रक्रियेस शेतकऱ्यांचा विरोध दिवसेंदिवस तीव्र होत आहे.

या प्रकल्पासाठी जमिनी अधिग्रहित केल्या जाणार असलेल्या मालेगाव तालुक्यातील १६ गावांमधील शेतकरी त्या विरोधात एकवटले आहेत.

या जमिनींसाठी शासनाकडून दिला जाणारा मोबदला अल्प आहे, असा रोष व्यक्त करत बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी शनिवारी मालेगाव-पुणे महामार्गावर चोंढी येथे 'रास्ता रोको' आंदोलन केले. गेल्या पंधरा दिवसात या प्रश्नी शेतकऱ्यांनी केलेले हे दुसरे आंदोलन आहे.


# बलुचिस्तानमध्ये सुरक्षा दलाने केले १७ दहशतवादी ठार

## स्फोटकांचा मोठा साठा केला जप्त

वृत्तसंस्था । क्वेटा

**बलुचिस्तानमध्ये सुरक्षा दलाबरोबर झालेल्या चकमकीमध्ये १३ दहशतवादी ठार झाले आहेत. हे दहशतवादी बंदी घातलेल्या वेगवेगळ्या संघटनांशी संबंधित होते. गोपनीय माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी ही कारवाई केली होती, असे इंटर सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्सने म्हटले आहे.**





हे सर्व दहशतवादी दिनांक २४ आणि २५ डिसेंबर रोजी झालेल्या तीन वेगवेगळ्या मोहिमांमध्ये मारले गेले. पंचगुर, कोहलू आणि कलाट येथे या दोन कारवाई झाल्या होत्या. तिन्ही ठिकाणी दहशतवादी असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर तातडीने या मोहिमा राबवण्यात आल्या, असे आयएसपीआरने म्हटले आहे.

पंचगुर जिल्ह्यात झालेल्या कारवाईच्यावेळी दहशतवादी लपून (पान २ वर)

## ३१ डिसेंबरपूर्वी रेशन कार्डाचे ई-केवायसी पूर्ण करा

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

जर तुम्ही रेशन कार्डाद्वारे मिळणाऱ्या मोफत धान्याचा लाभ घेत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी रेशन कार्डाची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही मुदत पाळली नाही, तर १ जानेवारी २०२६ पासून तुम्हाला मिळणारे मोफत रेशन बंद होऊ शकते. त्यामुळे वेळेत स्टेटस तपासून ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# २०२६ या नवीन वर्षात तब्बल ४ ग्रहणे

## 'या' दिवशी असेल वर्षातील पहिले सूर्यग्रहण

वृत्तसंस्था । मुंबई

**खगोलशास्त्र आणि ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने २०२६ हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. नवीन वर्षात एकूण ४ ग्रहणे लागणार असून यामध्ये २ सूर्यग्रहणे आणि २ चंद्रग्रहणांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, वर्षातील पहिलेच चंद्रग्रहण होळीच्या दिवशी येत असल्याने धार्मिक क्षेत्रात याची मोठी चर्चा सुरू झाली आहे.**



१७ फेब्रुवारी २०२६ – हे वर्षातील पहिले सूर्यग्रहण असेल. हे ग्रहण आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेत दिसणार आहे. भारतात हे ग्रहण दिसणार नसल्यामुळे याचा सुतक काळ मान्य नसेल.

(वेळ: दुपारी ३:२६ ते रात्री ७:५७)

१२ ऑगस्ट २०२६ – हे सूर्यग्रहण युरोप, कॅनडा आणि ग्रीनलँडमध्ये दिसेल. भारतात हे ग्रहण रात्री ९:०४ तेपहाटे ४:२५ दरम्यान असेल, त्यामुळे ते भारतात दिसणार नाही आणि सुतक काळही पाळण्याची गरज नाही.

३ मार्च २०२६ – पहिले चंद्रग्रहण – होळी – हे २०२६ मधील पहिले चंद्रग्रहण असेल जे भारतात दिसणार आहे. फाल्गुन पौर्णिमेला म्हणजेच होळीच्या दिवशी हे खंडग्रास चंद्रग्रहण लागणार आहे.

**भारतात हे ग्रहण दुपारी ३:२० ते संध्याकाळी ६:४७ पर्यंत असेल. यामुळे भारतात सुतक काळ मान्य असेल आणि होळीच्या पूजेवरही याचा परिणाम होऊ शकतो. सुतक काळ सकाळी ६:२० पासून सुरू होईल. २८ ऑगस्ट २०२६ – दुसरे चंद्रग्रहण हे वर्षातील शेवटचे ग्रहण असेल, परंतु ते भारतात दिसणार नाही. त्यामुळे याचे वेध किंवा सुतक काळ भारतात पाळला जाणार नाही.**

## भारतावर येणार कोरोना पेक्षा मोठे संकट; डॉक्टरांनी दिला इशारा

वृत्तसंस्था । दिल्ली

**भारतातील वाढते वायू प्रदूषण आता केवळ पर्यावरणाचा प्रश्न उरला नसून, ते देशातील सर्वात मोठे आरोग्य संकट बनले आहे. ब्रिटनमधील भारतीय वंशाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी दिलेल्या एका इशाऱ्यामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे.**

वायू प्रदूषणामुळे भारतासमोर कोरोनापेक्षाही कित्येक पट मोठी महामारी उभी ठाकली असून, उत्तर भारतातील लाखो लोकांची फुफ्फुसे आधीच निकामी होण्याच्या मार्गावर असल्याचा धक्कादायक दावा डॉक्टरांनी केला आहे.

**तज्ज्ञांचे काय आहे म्हणणे?**

लिव्हरपूलमधील फुफ्फुस रोगतज्ञ डॉ. मनीष गौतम यांच्या मते, उत्तर भारतातील विषारी हवेमुळे लाखो लोकांच्या फुफ्फुसांना गंभीर इजा झाली आहे. ते म्हणतात, ज्याप्रमाणे आपण क्षयरोगाविरुद्ध युद्धपातळीवर मोहीम राबवली, तशीच मोहीम आता फुफ्फुसांच्या आजारांसाठी राबवण्याची गरज आहे. वायू प्रदूषण ही एक सायलेंट किलर महासाथ असून ती हळूहळू संपूर्ण पिढीला पोखरत आहे.

**रुग्णालयांत २० ते ३० टक्के वाढ :** डिसेंबर (पान २ वर)

## थोडक्यात

### शॉर्टसर्किटमुळे घराला आग; ३ लाखांचे नुकसान

**जळगाव ।** येथील शांती नगर परिसरातील एका घराला शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना शनिवार, दि.२७ रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत घरमालकाचे साधारणतः ३ लाख रुपयांपर्यंत नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मंगलसिंग बडगुजर हे शांती नगर-१ येथे वास्तव्यास असून दुपारी अचानक शॉर्ट सर्किट होऊन त्यांच्या घरात आग लागली. कुटुंबियांना समजताच त्यांनी बाहेर जाऊन शेजाऱ्यांना याबाबत माहिती दिली. तोपर्यंत आग घरात पसरली व यात आगीत टीव्ही, फ्रिज, गादी, किचनमधील साहित्य आदी संसारोपयोगी साहित्य जाळून खाक झाले. याबाबत महापालिकेच्या अग्निशमन दलाला माहिती देण्यात आली. आगीच्या बंबाने आग विझविली. या घटनेत ३ लाखांपर्यंत नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

### रोटरीतर्फे ब्लँकेट, स्वेटर, कानटोपीचे वितरण

**जळगाव ।** रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रलतर्फे सिव्हिल हॉस्पिटल येथे गरजू रुग्ण व व्यक्तींना ब्लँकेट, स्वेटर, कानटोपी याचे वितरण करण्यात आल्याचे अध्यक्ष जितेंद्र बरडे यांनी सांगितले. याप्रसंगी रोटरी सेंट्रलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नरेंद्र जैन, माजी अध्यक्ष डॉ. राहुल मयूर, विपुल पारेख, प्रकल्प प्रमुख कल्पेश दोशी, मानद सचिव ड.केतन ढाके, महेंद्र गांधी, समर्थसिंग पाटील, शामलाल कुकरेजा यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी रोटरी सेंट्रलचे मिलन मेहता, हरीश ठक्कर, निलेश सुरतवाला, सुनील बाफना, महेश गदोडिया, अमित अग्रवाल, शामकांत वाणी, मनोज पाटील, जतिन ओझा, ललित मल्हारा, डॉ. चंद्रकांत साळुंखे यांचे सहकार्य लाभले.

# महापालिकेत महायुतीतील तिन्ही घटक एकत्र लढणार; बैठकीत शिक्कामोर्तब

**● जागा वाटपाचे सूत्र आज जाहीर होणार? बैठकीला तिन्ही पक्षांच्या नेत्यांची उपस्थिती**

प्रतिनिधी । जळगाव

**महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये महायुतीमधील मित्र पक्ष भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट एकत्र आले आहेत. महायुतीतील तिन्ही घटक एकत्र मिळून निवडणूक लढण्याविषयी आता शिक्कामोर्तब झाले आहे. जागा वाटपाचे सूत्र रविवारी जाहीर केले जाण्याची शक्यता आहे.**

जळगावात शुक्रवारी पार पडलेल्या बैठकीमध्ये भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमध्ये चर्चा झाली. ही चर्चा सकारात्मक झाली असून या बैठकीनंतर महायुतीची घोषणा करण्यात आली. जळगाव शहर महानगरपालिकेची निवडणूक ही महायुतीमधील तिन्ही घटक पक्षांनी एकत्रित लढवावी अशी सूचना मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी जळगाव जिल्ह्यातील नेत्यांना केल्याची माहिती मिळाली आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज तीनही पक्षांची एकत्रित बैठक झाली.

बैठकीला भारतीय जनता पक्षाचे निवडणूक प्रमुख आ.राजूमामा भोळे, निवडणूक प्रभारी आ.मंगेश चव्हाण, महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, पालकमंत्री गुलाबराव पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आ.अनिल पाटील, जिल्हाध्यक्ष संजय पवार, महानगराध्यक्ष अभिषेक पाटील आदींची उपस्थिती होती. महानगरपालिकेतील ७५ जागांवर आता महायुती एकत्रित लढणार असून प्रत्येक पक्षाला किती जागा येतील हे आता रविवारी जाहीर होण्याची शक्यता पक्षातील नेत्यांनी दिली आहे.

### ■ २३५ अर्जांची खरेदी, २४ उमेदवारी अर्ज दाखल...

शनिवारी (दि.२७) एकाच दिवशी तब्बल २४ उमेदवारी अर्ज दाखल झाले. २३५ इच्छुक उमेदवारांनी अर्जांची खरेदी केल्याने



महापालिका निवडणुकीची रंगत वाढत चालली आहे. निवडणूक शाखेकडून प्राप्त माहितीनुसार, प्रभाग क्रमांक १ मधून १०, प्रभाग क्रमांक २ मधून २६, प्रभाग क्रमांक ३ मधून १२, प्रभाग क्रमांक ४ मधून १५, प्रभाग क्रमांक ५ मधून ६, प्रभाग क्रमांक ६ मधून १५, प्रभाग क्रमांक ७ मधून २, प्रभाग क्रमांक ८ मधून ६, प्रभाग क्रमांक ९ मधून १२, प्रभाग क्रमांक १० मधून ८, प्रभाग क्रमांक ११ मधून १३, प्रभाग क्रमांक १२ मधून ११, प्रभाग क्रमांक १३ मधून २३, प्रभाग क्रमांक १४ मधून १४, प्रभाग क्रमांक १५ मधून ७, प्रभाग क्रमांक १६ मधून १४, प्रभाग क्रमांक १७ मधून २१, प्रभाग क्रमांक १८ मधून ८ तर प्रभाग क्रमांक १९ मधून १२ उमेदवारी अर्जांची विक्री झाली. तर प्रभाग क्रमांक १ मधून १, प्रभाग क्रमांक २ मधून २, प्रभाग क्रमांक ७ मधून १, प्रभाग क्रमांक १२ मधून ३, प्रभाग क्रमांक १३ मधून ४, प्रभाग क्रमांक १५ मधून ४, प्रभाग क्रमांक १६ मधून ६, प्रभाग क्रमांक १७ मधून १ आणि प्रभाग क्रमांक १८ मधून २ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. दरम्यान, राजकीय पक्षांचीदेखील हालचाल वाढली असून भारतीय जनता पक्षाकडून प्रभाग क्रमांक १२ ब मधून उज्ज्वला बेंडाळे यांनी तर प्रभाग क्रमांक १३ मधून शिंदे गटाकडून ज्योती चव्हाण यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय समीकरणे आकार घेऊ लागली आहेत.

# महायुती निश्चित होणार; ७५ पैकी ६५ जागा ताब्यात येतील

**● ना.गिरीश महाजन यांनी व्यक्त केला विश्वास**

प्रतिनिधी । जळगाव



**महानगरपालिका निवडणुकीत भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस यांची महायुती निश्चित होणार असून, ७५ पैकी तब्बल ६५ जागा महायुतीच्या ताब्यात येतील, असा विश्वास भाजपचे ज्येष्ठ नेते जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला.**

जळगाव येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. याप्रसंगी आ.मंगेश चव्हाण, आ. राजूमामा भोळे उपस्थित होते. मंत्री महाजन म्हणाले की, शिवसेनेसह जागा वाटपाबाबतची चर्चा अंतिम टप्प्यात असून, राष्ट्रवादी काँग्रेससोबत अजून बोलणी बाकी आहे. उद्या मंत्री गुलाबराव पाटील यांच्यासोबत सविस्तर चर्चा होणार असून दुपारी १२ वाजेपर्यंत सर्व चित्र स्पष्ट होईल. अंतिम निर्णय आणि अधिकृत घोषणा उद्याच केली जाणार आहे. गेल्या मनपा निवडणुकीत भाजपचे ५७ तर शिवसेनेचे १८ नगरसेवक निवडून आले होते. यंदा मात्र दोन्ही पक्ष परस्पर तडजोडीस तयार असून, राष्ट्रवादी काँग्रेसला ५ ते ८ जागा देण्यावर प्राथमिक चर्चा सुरू असल्याचे मंत्री महाजन यांनी स्पष्ट केले. महायुतीचा फॉर्म्युला ठरवताना जिंकण्याची क्षमता, स्थानिक परिस्थिती आणि संघटनात्मक ताकद या निकषांवर निर्णय घेतला जाईल. महायुतीमुळे काही कार्यकर्ते नाराज होण्याची शक्यता नाकारता येत नाही; मात्र योग्य वेळी सर्वांचे पुनर्वसन केले जाईल आणि प्रत्येकाला संधी दिली जाईल, असा दिलासाही त्यांनी दिला. पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर अन्याय होणार नाही, असेही ते म्हणाले. दरम्यान, गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत भाजपकडून निवडून आलेले, मात्र नंतर बंडखोरी करून शिवसेनेत गेलेल्या नगरसेवकांना उमेदवारी देऊ नये, असा भाजपचा आग्रह असल्याचेही त्यांनी सांगितले.

# कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचे पगार तात्काळ अदा करा; संघटनेची मागणी

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा नोव्हेंबर महिन्याचा पगार अद्याप झालेला नसून हा पगार तात्काळ अदा करावा, अशी मागणी जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेतर्फे करण्यात आली असून या मागणीचे निवदेन आ.सत्यजित तांबे व आ.किशोर दराडे यांना देण्यात आले आहे.**

निवेदनात, जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा नोव्हेंबर महिन्याचा पगार अद्याप झालेला नाही. शाळा-महाविद्यालयांनी वेतन बिल उपसंचालकांच्या लॉगिनला पाठवलेले आहेत. नाशिक विभागीय उपसंचालकांनी अद्यापपर्यंत पूर्ण न केल्यामुळे डिसेंबर अखेर आला तरी देखील काही कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे पगार अद्यापपर्यंत झालेले नाही, बिल कोणी अप्रूव्ह करावे, शिक्षणाधिकारी यांनी करावे की, शिक्षण उपसंचालकांनी करावे, या वादामध्ये हे बिल मागे पडली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**अशा आहेत मागण्या**

शिक्षण उपसंचालकांनी नोव्हेंबरचा पगार तात्काळ अदा करावा, कनिष्ठ महाविद्यालयांच्या संचमान्यतेबरोबर मॅपिंग यात जर अपूर्णता असेल तर पुढील महिन्यात याविषयी आग्रह धरावा, आदी मागण्या देखील या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

निवेदन देतेवेळी, जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेचे अध्यक्ष नंदन वालिंकर, कार्याध्यक्ष प्रा.शैलेश राणे, प्रा.सुनील सोनार, प्रा.सुनील गरुड, प्रा.अतुल इंगळे, प्रा.वंजारी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

विधानपरिषदेचे आ.सत्यजित तांबे व आ.किशोर दराडे यांना देण्यात आले असून या प्रश्नाकडे लक्ष घालण्याची विनंती देखील संघटनेकडून करण्यात आली आहे.

# जळगावातून मोटरसायकल चोरी करणाऱ्या मध्यप्रदेशातील युवकास शिरपूरमधून अटक

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील विविध भागांमधून दुचाकी लांबवणाऱ्या मध्यप्रदेशातील अंजनगाव येथील एका चोरट्यास स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने शिरपूर येथून अटक केली. त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून तीन मोटरसायकल जप्त करण्यात आल्या आहेत.**



### ■ या पथकाने केली कारवाई...

स्थानिक गुन्हा शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र वल्टे, शेखर डोमाळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल संदिप पाटील, हरिलाल पाटील, प्रविण मांडोळे, पोलीस कॉन्स्टेबल राहुल कोळी, चालक पोलीस हेड कॉन्स्टेबल दीपक चौधरी आदींच्या पथकाने ही कारवाई केली. चोरट्यास पुढील तपासकामी शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल उमेश भांडारकर करीत आहेत.

शहरात मोटरसायकल चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याने हे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सुचना पोलीस प्रशासनाकडून देण्यात आल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाकडून तपास सुरू असतांना पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना विकास चंपालाल बरडे (रा.अंजनगाव, ता.सेंधवा, जि.बडवानी) याने जळगाव शहरातील विविध भागांतून दुचाकी लांबवल्याची माहिती मिळाली होती.

त्यानुसार त्याला शिरपूर येथून ताब्यात घेवून त्याची चौकशी केली. त्यावेळी त्याने मोटरसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून जळगाव शहर, रामानंद नगर पोलीस स्टेशनला दाखल गुन्ह्यातील ३ मोटरसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत.

## पान १ वरुन

### तुरुंगातून थेट निवडणूक......

तिघांना विशेष न्यायालयाने सशर्त परवानगी दिली आहे. बंडू आंदेकर, लक्ष्मी उदयकांत आंदेकर, सोनाली वनराज आंदेकर यांना परवानगी दिली गेली आहे. मात्र न्यायालयाने बंडू आंदेकरला मिरवणूक, भाषण आणि घोषणाबाजी करण्यास स्पष्ट मनाई केली होती. तरीही प्रत्यक्षात घोषणाबाजी आणि शक्तीप्रदर्शन पाहायला मिळाले. लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर या दोघीही ५ कोटी ४० लाख रुपयांच्या खंडणी प्रकरणात सध्या कारागृहात आहेत. आंदेकर कुटुंबातील हे तिघेही प्रभाग क्रमांक २२, २३ आणि २४ मधून निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याची माहिती आहे. पोलिसांचा कडक बंदोबस्त - बंडू आंदेकरला खंडणीच्या गुन्ह्यात कारागृहातून गुन्हेशाखेने पोलीस कोठडीत घेतले आहे. तो सध्या गुन्हे शाखा युनिट एकच्या ताब्यात आहे. तर लक्ष्मी आणि सोनाली आंदेकर या कोल्हापूर कारागृहात आहेत. त्यांना तेथून सकाळी साडे नऊला पुणे शहरात आणण्यात आले. तीघांनाही साडे अकराच्या सुमारास क्षेत्रीय कार्यालयात आणण्यात आले. ते दुपारी तीन वाजता बाहेर पडले. तो पर्यंत परिसरात कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस उपायुक्त, सहायक आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि गुन्हे शाखेची पथके तैनात करण्यात आली होती. परिसरात बॅरिकेटस लावून सर्वसामान्य नागरिकांना बंदी घालण्यात आली होती. यामुळे आंदेकर टोळीचे नंबरकारी तीकडे फिरकलेच नाहीत.

### बलुचिस्तानमध्ये सुरक्षा दलाने......

बसलेल्या ठिकाणाला सुरक्षा दलांनी वेढा घालून कारवाईला सुरुवात केली. त्यावेळी जोरदार धुमश्चक्री झाली आणि ४ दहशतवादी मारले गेले. कोहलू भागात गुरुवारी झालेल्या कारवाईच्यावेळी दोन्ही बाजूंनी मोठा गोळीबार झाला आणि ५ दहशतवादी मारले गेले. तर बुधवारी कताट भागात सुरक्षा दलांच्या कारवाईमध्ये ८ दहशतवादी मारले गेले. शस्त्रे, दारुगोळा आणि स्फोटकांचा मोठा साठा या दहशतवाद्यांकडून जप्त करण्यात आला. हे दहशतवादी अनेक घातपाती कारवायांमध्ये गुंतलेले होते, असेही निवेदनात म्हटले आहे. या महिन्याच्या सुरुवातीला देखील कलाट भागात सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईमध्ये १२ दहशतवादी ठार झाले होते. बलुचिस्तानमध्ये सक्रिय असलेल्या दहशतादी कारवायांना रोखण्यासाठी सुरक्षा दलांनी अझ्म-ए-इस्तेहकाम ही मोहिम सुरू केली आहे.

### मी कट्टर विरोधकच......

शत्रू पक्षाच्या संघटनेचे कौतुक झाल्याने काँग्रेसमधील अनेक कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी नाराजी व्यक्त केली. सोशल मीडियावर टीका सुरू झाल्यावर दिग्विजय सिंह यांनी तातडीने स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले की, माझ्या टिप्पणीचा चुकीचा अर्थ काढला गेला आहे. मी केवळ एका मजबूत संघटनात्मक रचनेचे कौतुक केले आहे. मी संघाचा आणि मोदीजींचा कट्टर विरोधक होतो, आहे आणि उद्याही राहीन. संघटना मजबूत करणे आणि तिची प्रशंसा करणे यात काय चुकीचे आहे?

### भारतावर येणार कोरोना......

महिन्यात दिल्ली आणि आसपासच्या भागातील श्वसनविकाराच्या रुग्णांमध्ये २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका, ङ्गवारंवार होणारी डोकेदुखी आणि हलका खोकला. आणि घसा खवखवणे आणि डोळे कोरडे पडणेफ लोक या लक्षणांकडे किरकोळ समजून दुर्लक्ष करतात, मात्र हा फुफ्फुसे खराब होण्याचा सुरुवातीचा टप्पा असू शकतो. हृदयविकाराचाही वाढता धोका - बर्मिंगहॅम येथील हृदयरोगतज्ज्ञ प्रोफेसर डेरेक कॉनोली यांनी स्पष्ट केले की, हवेतील अतिसूक्ष्म कण (PM 2.5) डोळ्यांना दिसत नाहीत, पण ते थेट रक्ताभिसरण प्रक्रियेत मिसळून हृदयविकाराला निमंत्रण देतात. प्रदूषणाचा हा परिणाम हळूहळू पण अत्यंत जीवघेणा ठरतो.

वाहतूक क्षेत्र जबाबदार - केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनीही ही वस्तुस्थिती मान्य केली आहे की, दिल्लीसारख्या शहरांमधील एकूण प्रदूषणापैकी सुमारे ४० टक्के प्रदूषण हे केवळ वाहतूक क्षेत्रामुळे होत आहे. जर तातडीने कठोर उपाययोजना केल्या नाहीत, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती व्यक्त होत आहे. दिल्ली आणि मुंबईत हवा आरोग्यासाठी घातक श्रेणीत पोहोचली आहे. आताच उपाययोजना न केल्यास भारत एका अशा महामारीच्या उंबरठ्यावर उभा असेल, जिथे ऑक्सिजन सिलेंडर ही गरज नसून हतबलता असेल.

# होमगार्ड संघटनेचा स्थापना दिवस विविध उपक्रमांनी साजरा



प्रतिनिधी । जळगाव

महाराष्ट्र होमगार्ड संघटनेचा स्थापना दिवस ६ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. त्यानिमित्त होमगार्डचे महासमादेशक यांच्या आदेशान्वये दि.७ ते १३ डिसेंबर दरम्यान वर्धापन दिन सप्ताह साजरा करण्यात आला.

या सप्ताहांतर्गत जिल्ह्यातील तालुका पथक निहाय वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, शासकीय रुग्णालयात फळ वाटप, गरजूंना ब्लँकेट वाटप, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर आदी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

शहरातील विविध शाळांच्या ठिकाणी अग्निशमन, विमोचन याचे प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

# भाजपातर्फे शंभर गरजूंना ब्लँकेट वाटप

**● व्यापार आघाडीतर्फे राबवण्यात आला उपक्रम**

प्रतिनिधी । जळगाव

**भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती व वीरबाल दिनानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या व्यापार आघाडीतर्फे रेल्वे स्टेशन परिसरातील १०० गरीब व गरजू बांधवांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.**



शुक्रवार, दि.२६ रोजी रात्री ९.३० वाजता रेल्वे स्थानक परिसरात हा उपक्रम राबवण्यात आला. आ.राजूमामा भोळे, महानगराध्यक्ष जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, कृशी उत्पन्न बाजार समिती सदस्य तथा उद्योजक अशोक राठी आदींच्या या ब्लँकेट वाटप करण्यात आल्या. भाजपा व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष विनय बाहेती, सुरेंद्र अग्रवाल, भूषण देपुरा, उमेश जैन, मुकेश कुकरेजा, जितेंद्र चव्हाण, राकेश लढ्ढा, मनीष ओझा, किर्तन शेजपारा व पदाधिकाऱ्यातर्फे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी भाजपचे जिल्हा सरचिटणीस जयेश भावसार, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख मनोज भांडारकर, मंडल अध्यक्ष आनंद सपकाळे, मनोज सोनवणे, महेश चौधरी यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक वाचन, गट चर्चाने वीर बाल दिवस साजरा

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग व ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालय विभागात शुक्रवार, दि.२६ रोजी वीर बाल दिवस, ग्रंथ प्रदर्शन, सामूहिक वाचन व गट चर्चा असे दोन उपक्रम विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रात साजरे करण्यात आले. सदर उपक्रमात सुमारे ३०० विद्यार्थी वाचनासाठी सहभागी झाले होते. ज्ञान स्रोत केंद्रातर्फे विद्यार्थ्यांसाठी अवांतर वाचनाची पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली.**



कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.सोपान इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.जयदीप साळी, प्रा.पवित्रा पाटील, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक प्रा.चंद्रशेखर वाणी, विजय आहेर, प्रवीण चंदनकर आदी उपस्थित होते.

विद्यापीठात वीर बाल दिवसाच्या निमित्ताने कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वीर बाल दिवस दरवर्षी २६ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस दहावे शीख गुरु श्री गुरु गोबिंद सिंह महाराज यांचे सुपुत्र साहिबजादे जोरावर सिंह व साहिबजादे फतेह सिंह यांच्या अद्वितीय शौर्य, बलिदान व धर्मनिष्ठेच्या स्मरणार्थ पाळला जात असून विद्यार्थ्यांमध्ये शौर्य, नैतिक मूल्ये, देशभक्ती व श्रद्धा निर्माण व्हावी, म्हणून हा दिवस साजरा केला जात असल्याचे ते म्हणाले.

यानंतर ज्ञान स्रोत केंद्रात आयोजित कार्यक्रमात केंद्राचे संचालक डॉ.चंद्रशेखर वाणी यांनी विद्यार्थ्यांना गटचर्चेचे नियम समजावून सांगत, ग्रंथवाचनाचे महत्त्व विशद केले.

यावेळी अधिसभा सदस्य डॉ. ऋषिकेश चित्तम यांनी विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्त्व सांगून मार्गदर्शन केले. भारतीय ज्ञान प्रणाली सक्षम युवक घडविण्यात समर्थ आहे का? ती जागतिक स्तरावर आपले स्थान निर्माण करत आहे का? भारत खरंच विकसित होत आहे का? अशा विविध विषयांवर गटचर्चा घेण्यात आल्या.

गटचर्चेत ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून विजयी विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रा.डॉ.कविता मनोहर पाटील व प्रा.योगेश माळी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (मोबा. – ७५८८८१३१३२) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### नगराध्यक्ष जाधव, गटनेते नगराळे यांचा सत्कार

**नवापूर ।** नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने घवघवीत यश संपादन करत शहराच्या राजकारणात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. या यशानंतर लोकनियुक्त नगराध्यक्ष जयवंत जाधव तसेच गटनेते नरेंद्र नगराळे यांची सदिच्छा भेट घेऊन विविध मान्यवरांनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी भाजपाचे प्रातिनिधिक सदस्य सुरेश रामराव पाटील, राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे, सतीश देसले, दादाजी तोरवणे, विजय भामरे आदी उपस्थित होते. सर्वांनी नगराध्यक्ष व गटनेत्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी इगतपुरीचे माजी आ.निर्मल गावीत, भरत गावीत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### आत्महत्येची धमकी देणारी तरुणी बेपत्ता

**शिरपूर ।** कॉलेजला जात असल्याचे सांगून घरातून निघालेल्या तरुणीने काही वेळातच घरी फोन करून आत्महत्या करत असल्याचे सांगितल्याने शिरपूर शहरात खळबळ उडाली. मात्र या घटनेला दोन दिवस उलटूनही संबंधित तरुणीचा कोणताही थांगपत्ता लागलेला नाही. पालकांनी अखेर शिरपूर पोलिस ठाण्यात मुलगी बेपत्ता असल्याची नोंद केली आहे. शिरपूर शहरातील एका हॉटेल व्यावसायिकाने आपली १९ वर्षीय मुलगी बेपत्ता झाल्याबाबत पोलिसांत तक्रार दिली आहे. बुधवार, दि.२४ रोजी सकाळी नेहमीप्रमाणे कॉलेजला जाते असे सांगून ती घरातून निघाली होती. काही वेळानंतर तिने घरी फोन करून आपण आत्महत्या करत असल्याचे सांगितले.

# स्वातंत्र्याची ७८ वर्ष उलटूनही रस्ता नसल्याने तोलवापाडावासीयांचा जीवघेणा संघर्ष

## ● रस्त्याअभावी ५ वर्षांत ८ जणांनी गमावला जीव; गरोदर मातांचाही समावेश



प्रतिनिधी । मोलगी

**अक्कलकुवा तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या पिंपळखुंटाचा तोलवापाडा हे गाव स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतरही दळणवळणाच्या सोयी सुविधापासून दुर्लक्षित आहे. देशाने स्वातंत्र्याची अठ्यात्तरी ओलांडली असली तरी देखील या पाड्याकडे शासन व प्रशासनाने डोळेझाक केल्यामुळे रस्ताच नसल्याने येथील ग्रामस्थांना नागमोडी, अरुंद आणि चढउतार असलेल्या जीवघेण्या पायवाटेचा आधार घ्यावा लागत आहे. यामुळे आता आम्हाला रस्त्यासह विविध सोयी सुविधा पूरवा अशी आर्त हाक येथील नागरिकांनी शासनासह लोकप्रतिनिधींना दिली आहे.**

तोलवापाडा हे गाव स्वातंत्र्योत्तर काळापासून ते आजपर्यंत पूर्णतः पायाभूत सुविधांपासून आऊट ऑफ द कव्हरेज राहिलेला आहे, यात महत्त्वाचे म्हणजे पिंपळखुटा ते मोठा तोलवापाडा दरम्यान सुमारे ४ किलोमीटरचा रस्ताच न झाल्याने येथील रहिवाशांना आजही जीवघेणा संघर्ष करत मरण यातना सहन कराव्या लागत आहेत. गेल्या पाच वर्षात रस्त्या अभावी रुग्णालयात वेळेवर पोहचू न शकल्याने आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याचे ग्रामस्थ सांगतात. या गावात जाण्यासाठी जेमतेम पादचारी रस्ता आहे. मात्र त्या रस्त्यावर पायी चालणे देखील अवघड आहे. जेमतेम वरच्या मोठा तोलवापाड्याला जोडणाऱ्या रुतवाई नदीवर एक पूल नंदुरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानंतर मंजूर करण्यात आला आहे. शिवाय पुलासाठी भलामोठा खड्डा खोदून ठेवण्यात आला आहे मात्र तीन महिन्यापासून बांधकाम ठेकेदारच गायब झालेला आहे. खड्डा फक्त देखाव्यासाठी आहे. या पुलाचे प्रत्यक्ष बांधकाम होणार कधी असा संतप्त सवाल येथील ग्रामस्थ उपस्थित करीत असून संबंधित ठेकेदारावर कार्यवाहीची मागणी केली आहे.

**ठेकेदार तीन महिन्यापासून बेपत्ता**

रुतवाई नदीवर तीन महिन्यापासून फक्त खड्डा खोदून ठेवला आहे. ठेकेदार तीन महिन्यापासून बेपत्ता असून त्या खोदलेल्या खड्ड्यामुळे येथील ग्रामस्थांसह अबालवृद्ध, शाळेकरी मुले, अंगणवाडीत जाणारी लहान बालके, गरोदर तसेच स्तनदा मातांना या खड्ड्यातून वाट तुडवीत मार्ग काढतांना मोठा संघर्ष करुन मार्गक्रमण व्हावे लागते. तीन महिन्याच्या कालावधीत त्या खड्ड्यात पडून ग्रामस्थ जखमी देखील झाल्याच्या घटना घडल्या आहेत. संबंधित ठेकेदाराच्या या निष्क्रिय भूमिकेमुळे येथील नागरिकांना डोंगराळ, अरुंद, नागमोडी खोल दरीतून जीवघेण्या पायवाटेचा आधार घ्यावा लागतो, शिवाय तोलवापाड्यात कोणी आजारी पडल्यास त्या रुग्णाला याच डोंगराळ, नागमोडी, अरुंद खोल दरीतून जाणाऱ्या पायवाटेने घेऊन जावे लागते. या पायवाटेने रुग्णांना घेऊन जातांना मोठया अडचणींचा सामना करावा लागतो.

महत्वाचे म्हणजे पिंपळखुंटा ते मोठा तोलवापाडापर्यंतचा ४ किलोमीटरचा रस्ता राज्य शासनाच्या जिल्हा व ग्रामीण विकास योजनेतून (३०५४) मंजूर करण्यात आल्यानंतर त्यासाठी निधीही देण्यात आला आहे. परंतु, मंजूरी मिळून ५ वर्षे होऊनही रस्त्याचे काम सुरूच झालेले नाही. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शहादा (५०५४) मार्ग व पूल (४) जिल्हा व इतर मार्ग या योजनेंतर्गत तोलवापाडा पिंपळखुंटा काकडतीपाडा रस्ता तयार करणे या कामाचे भूमिपूजन सोहळा दि.२ डिसेंबर २०२३ रोजी माजी आमदारांच्या हस्ते संपन्न झाला होता. मात्र, त्यानंतरदेखील ठेकेदाराने कामाला सुरुवात केलेली नाही. त्यामुळे डोंगरदऱ्यातून व घाटातून पायीच पिंपळखुटा आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्यास उशीर झाल्याने गेल्या ५ वर्षांत गरोदर मातांसह एकूण ८ जणांचा मृत्यू झाल्याचे देखील येथील ग्रामस्थांनी सांगितले.

**तत्काळ रस्त्याचे काम करण्याची होतेय मागणी**

रस्त्याअभावी येथील रहिवाशांना २ किलोमीटरचा घाट उतरुन रतवाई नदी ओलांडल्यावर पुन्हा १ किलोमीटरचा घाट चढून मुख्य रस्ता गाठावा लागतो. मोठा तोलवापाड्यातून एकुण ६० पेक्षा अधिक बालके लहान तोलवापाडा येथील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीत याच घाटातून येतात. त्यांच्या जीवाला याच घाटात सर्वाधिक धोका असल्यामुळे तत्काळ येथे रस्त्याचे काम करण्यात यावे, व संबंधित ठेकेदाराची चौकशी करुन कारवाई करण्याची अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

### ■ रुग्णांना बांबूच्या झोळीतून नेण्याची वेळ...

पिंपळखुंटाचा मोठा तोलवापाड्यातील रहिवासी वाहऱ्या जुगला वसावे (वय-८०) यांची अचानक ताप, सर्दी, खोकल्यामुळे तब्येत बिघडली. परिणामी शरीरातील ऊर्जाच साथ देत नसल्यामुळे त्यांना चालणे मुश्किल झाले होते. त्यांना तात्काळ आरोग्यसेवेची आवश्यकता होती. त्यामुळे स्थानिकासह नातेवाईकांवर त्यांना बांबूच्या झोळीतून खडतर पायवाटेचा आधार घेत मुख्य रस्त्यापर्यंत नेण्याची वेळ आली. तेथून त्यांना मोलगी येथील खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले. **तोलवापाड्यापर्यंत वाहनच पोहचू शकत नसल्याने बऱ्याचदा रूग्णांना ॲम्बुलंन्सऐवजी बांबूलन्सचा आधार घ्यावा लागतो.** कापडाची झोळी बांधून पिंपळखुटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत नेण्यासाठी सुमारे ४ किलोमीटरचा पल्ला गाठावा लागतो. त्यामुळे काही रुग्ण वाटेतच दगावत असल्याची सद्यस्थिती आहे. हे दाहक वास्तव अनेकांच्या मनाला चटका लावून जाणारे आहे.

“ पुर्वीपासून आम्ही तोलवापाड्यात वास्तव्य करीत आलो असून आमची चौथी पिढी येथे वास्तव्यास आहे. आमच्या पाड्याच्या सोयी सुविधेसाठी ना शासनाने, ना लोकप्रतिनिधीनीलक्ष दिले. आजही ना रस्ते, ना पाणी अश्या अनेक संकटाचा सामना करत आजही आम्ही जीवन जगतोय. वीज वगळता कोणतीच सुविधा वा योजना आमच्यापर्यंत पोहचल्या नाहीत. पाण्यासाठीची आमची वणवण कायम पूजलेलीच आहे. रतवाई नदीच्या डोंगरावरील उंच भागातून डबके तयार करुन त्यातून पाईप टाकून उतरत्या भागातून पाईप वळवून आम्ही आमच्या स्वखर्चाने पाणी पोहचवून पिण्यासाठी वापर करीत असतो एवढा संघर्षमय जीवन जगत असतांना देखील कोणाला ते दृश्य दिसले नसेल तर ती शोकांतिकाच म्हणावी म्हणुन आम्ही यापुढील येणाऱ्या जि. प. व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या वेळेस कोणत्याच पक्षाच्या उमेदवाराला मतदान न करण्याचा निर्णय घेतला आहे.

**– कर्मा सेदा वसावे, ग्रामस्थ, तोलवापाडा**

“ गाव पाड्याच्या विकासाच्या दृष्टीने दळणवळणाची सुविधा उपलब्ध होणे अपेक्षित असते. परंतु आमच्या तोलवापाड्याचे दुर्दैव म्हणावे, का आजही आम्हाला आमचे जीवनमान उंचावण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. रस्त्याअभावी आमच्या पाड्यातील लेकरांना पाड्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या एक ते दीड किमी अंतरावरील जिल्हा परिषदेची शाळा व अंगणवाडी केंद्रात जाणे येणे शक्य होत नाही. रस्त्याअभावी आम्हाला आरोग्यांच्या देखील अडचणी निर्माण होतात. आम्ही अजून किती यातना सहन करायच्या. आम्हीही माणसेच आहोत. त्यामुळे शासनाने आतातरी आमच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

**– रमेश चमाऱ्या वसावे, ग्रामस्थ, तोलवापाडा**

# खुनाच्या गुन्ह्यातील पेरोलवरील गुन्हेगाराला गावठी कट्टयासह एलसीबीने केली अटक

प्रतिनिधी । धुळे



**खुनाच्या गुन्ह्यात शिक्षा झाल्यानंतर पॅरोलवर सुटलेल्या अट्टल गुन्हेगाराला गावठी कट्टासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गजाआड केले. दि. २४ डिसेंबर रोजी सायंकाळी प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. विठ्ठल वामन भोळे (वय–५२, रा.भादली, जि.जळगाव, ह.मु सानेचौक, आकुर्डी, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.**

त्यास मुंबई-आग्रा महामार्गावरील शहरातील रेसिडेन्सी पार्क हॉटेलजवळून पकडण्यात आले. त्याच्याकडून ४० हजाराचा गावठी कट्टा (पिस्टल), ३ हजाराचे ३ जिवंत काडतुसे, १ हजाराचा मोबाईल व ३० हजाराची दुचाकी असा एकूण ७४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी मोहाडीनगर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान आरोपी भोळे याला भुसावळ येथील बाजारपेठ पोलीस ठाण्यात दाखल खुनाच्या गुन्ह्यात तब्बल २६ वर्षांची शिक्षा झाली होती. पॅरोलवर सुटून आल्यानंतर चोरी, जबरी चोरी, अग्निशस्त्र बाळगणे तसेच त्याची खरेदी विक्री यासारखे गुन्हे सातत्याने करत असल्याची नोंद आहे. त्यांच्याविरोधात जळगाव, धुळे, पुणे जिल्ह्यात खून, जबरी चोरी, घरफोडी, शस्त्र बाळगणे, एमपीडीए, आर्म ॲक्टसह विविध गंभीर गुन्हे आहेत.

### विद्यार्थ्यांना केळी चिप्स बनविण्याचे प्रशिक्षण

प्रतिनिधी । तळोदा

तालुक्यातील रांझणी येथील शेठ राणूलाल फुलचंद जैन कृषी तंत्र विद्यालयात कच्च्या केळीपासून वेफर्स व चिप्स बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

कृषी तंत्र विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून प्राचार्य प्रफुल्ल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विषय शिक्षिका संगिता वसावे यांनी हे प्रशिक्षण दिले. त्यांनी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांकडून वेफर्स व चिप्स तयार करून घेतले. यावेळी प्राचार्य प्रफुल्ल पाटील, प्रा.प्रविण वसावे, प्रा.शरद साठे, भिक्कन पाटील, राजेश पाडवी, संगिता वसावे, दीपक मराठे, जितेंद्र वानखेडे व विद्यार्थी उपस्थित होते.

# गैरकायदेशीर कृत्यात सहभाग आढळल्यास कारवाई

## ● धुळे मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रेकॉर्डवरील गुन्हेगारांची झाडाझडती

प्रतिनिधी । धुळे



**जिल्हा पोलिसांतर्फे धुळे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर झाडाझडती मोहीम राबवण्यात आली. या मोहीमेंतर्गत विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील रेकॉर्डवरील ५४ सराईत गुन्हेगारांना शुक्रवार, दि.२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून त्यांच्यावर दाखल गुन्हे, प्रतिबंधक कारवाया तसेच जामिनाच्या अटींबाबत कडक शब्दांत समज देण्यात आली. तसेच निवडणूक काळात किंवा त्यानंतर कोणत्याही गैरकायदेशीर कृत्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग आढळल्यास हद्दपारी, मोक्का, मीनी मोक्का (बीएनएस १११) तसेच एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.**

गैरकृत्यात सहभाग सिद्ध झाल्यास जामीनाच्या अटींचा भंग झाल्याचा अहवाल न्यायालयात सादर करून जामीन रद्द करण्याची कार्यवाही केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले. सराईत गुन्हेगारांच्या सोशल मीडियावर सायबर पेट्रोलिंगद्वारे बारीक लक्ष ठेवण्यात येत असून प्रक्षोभक व्हिडीओ, रिल्स, लेख किंवा फोटो व्हायरल केल्यास कठोर कारवाई केली जाईल. तसेच स्थानिक गुन्हे शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांचे डी. बी. पथक त्यांच्या हालचालींवर सातत्याने नजर ठेवून आहे. धुळे शहर–९, आझादनगर १२, देवपूर – १२, पश्चिम देवपूर – ३, मोहाडीनगर ७, चाळीसगाव रोड ११ असे एकूण ५४ सराईत गुन्हेगारांना समज देण्यात आली. ही विशेष मोहीम पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे व अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार, आझाद नगरचे निरीक्षक निवृत्ती पवार, चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुरेशकुमार घुसर, मोहाडीच्या निरीक्षक शिल्पा पाटील, धुळे शहरचे निरीक्षक दिपक पाटील, देवपूरचे निरीक्षक समाधान वाघ, पश्चिम देवपूरचे सपोनि सचिन कापडणीस व पोलीस अंमलदार यांनी संयुक्तरित्या राबवली.

# शेतीला दिवसा वीज द्या, अन्यथा जनआंदोलन छेडणार

## ● भाजपाचा महावितरणला निवेदनाद्वारे इशारा; पाच दिवसांचा दिला अल्टिमेटम

प्रतिनिधी । शिंदखेडा



**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळामार्फत शिंदखेडा परिसरातील शेतकऱ्यांसाठी विजेचा रात्रीचा दिलेला वेळ बदलून दिवसा करावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टीतर्फे करण्यात आली आहे. याबाबत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महावितरणचे मुख्य कार्यकारी अभियंता अनुपस्थित असल्यामुळे सहाय्यक अभियंता भावेश तेटू यांना निवेदन दिले.**

भाजपातर्फे देण्यात आलेल्या निवेदनात, शेतकऱ्यांसाठी दिलेल्या शेतीच्या विजेचा कालावधी संध्याकाळी आठ ते पहाटे पाच असा असून तो शेतकऱ्यांसाठी अतिशय त्रासदायक आहे. पहिले दिवसाचा वेळ दिला व नंतर बदल करून शेतकऱ्यांची फरफट का करताय? असा संतप्त सवाल उपस्थित करण्यात आला आहे. शेती टिकली तर मनुष्य टिकेल ही भावना शेतकऱ्यांची असून त्या भावनेचा आपण आदर करावा आणि रात्रीची वेळ बदलून दयावी. अन्यथा पुढील पाच दिवसात जनआंदोलन छेडण्यात येईल. त्यामुळे होणाऱ्या परिणामास महावितरणचे अधिकारी स्वतः व कार्यालय जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी शहराध्यक्ष संजय महाजन, ॲड.विनोद पाटील, माजी उपनगराध्यक्ष भिला पाटील, दादा मराठे, कुणाल पाटील, ज्ञानेश्वर सकट, गुलाब सोनवणे, पंडीत माळी, श्याम सोनवणे, राजाराम सोनवणे, सुकदेव सोनवणे उपस्थित होते.

### ■ बिबट्यांचा वावर वाढल्यामुळे शेतकरी त्रस्त...

वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये बिबट्यांचा वाढलेला वावर तसेच रात्रीच्या वेळी वाढलेली थंडी अशा विविध गोष्टींमुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी देणे अतिशय कष्टदायक व त्रासाचे झाले असून शेती कशी कसावी या विवंचनेत शेतकरी बांधव आहे. विजेअभावी हातातील हंगाम निसटून जाण्याची भिती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे ती वेळ तात्काळ बदलून सकाळच्या सत्रात दिल्यास शेतीची कामे सहजपणे शेतकऱ्यांना करता येतील.

# प्रशासन गाव की ओर उपक्रम यशस्वीपणे राबवा : जिल्हाधिकारी

प्रतिनिधी । धुळे

**जिल्ह्यात १९ ते २५ डिसेंबर दरम्यान साजरा होणाऱ्या सुशासन सप्ताहांतर्गत प्रशासन गाव की ओर हा उपक्रम प्रभावीपणे राबवावा. नागरिकांच्या समस्या व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी विशेष व विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीला अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार व उपजिल्हाधिकारी (प्रशासन) संदिप पाटील यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी विसपुते यांनी, महसुल विभागाने तहसिल व मंडळस्तरावर, तर ग्रामविकास विभागाने पंचायत समितीस्तरावर तसेच कृषी व इतर विभागांनी लोकहितासाठी व प्रभावी प्रशासनासाठी शिबीराचे आयोजन करावे. या शिबिरांमधून लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनाचा लाभवेळेत द्यावा. तसेच ग्रामपातळीवर लाभार्थ्यांनी मांडलेल्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करावे. कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी विविध कार्यशाळांचे आयोजन करावे. विविध महामंडळांनी त्यांच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा, नाविन्यपूर्ण संकल्पनाचा वापर करुन नागरिकांना विविध सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सुचना दिल्या.

## थोडक्यात

### रेल्वेचा प्रवास महागला; भाडे दरात वाढ

**भुसावळ ।** भारतीय रेल्वेने प्रवासी भाडे संरचनेचे युक्तिसंगतीकरण केले. उपनगरीय सेवा, सिझन तिकिटे व २१५ किमीपर्यंतच्या द्वितीय श्रेणी साधारण प्रवासासाठी भाडेवाढ नाही. यात २१६ किमी ते ७५० किमी अंतरासाठी भाड्यात ५ रुपयांची वाढ, ७५१ किमी ते १२५० किमी अंतरासाठी १० रुपये, १२५१ किमी ते १७५० किमी अंतरासाठी १५ रुपये तर १७५१ किमी ते २२५० किमी अंतरासाठी २० रुपयांची टप्प्याटप्प्याने वाढ लागू करण्यात आली आहे. तर स्लीपर व प्रथम श्रेणी साधारणमध्ये प्रति किमी केवळ १ पैशांची वाढ तसेच मेल/एक्सप्रेस गाड्यांच्या एसी व नॉन-एसी श्रेणींमध्ये भाडेवाढ २ पैसे प्रति किमीपर्यंत मर्यादित करण्यात आली असून आरक्षण शुल्क, सुपरफास्ट अधिभार तसेच जीएसटी व भाडे पूर्णांकन नियमात कोणताही बदल नाही. सुधारित भाडे केवळ २६ डिसेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर बुक केलेल्या तिकिटांवरच लागू होईल. या तारखेपूर्वी बुक केलेल्या तिकिटांवर, प्रवासाची तारीख नंतरची असली तरीही, कोणताही अतिरिक्त शुल्क आकारला जाणार नाही.

### श्रीनाथ स्कूलमध्ये ख्रिसमस साजरा

**वरणगाव ।** येथील श्रीनाथ इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये ख्रिसमस सण उत्साहात साजरा करण्यात आला. प्रसंगी मुख्याध्यापिका सरिता बाऊस्कर यांनी विद्यार्थ्यांना ख्रिसमस सणाबद्दल माहिती देऊन सणाचे महत्व सांगितले. यावेळी सर्व मुलांनी वेगवेगळ्या रंगाचे ड्रेस परिधान केलेले होते. यात विद्यार्थ्यांनी सांताक्लॉजचे ड्रेस परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सूत्रसंचालन पूजा चौधरी तर आभार नीलिमा चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दीपक बेंडाळे, सपना सावळे, लीना सोनवणे, नयना सोनार, सुनिता पाटील, ममता बाऊस्कर यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य लाभले.

### चारूदत्त आफळे यांचे ३ रोजी व्याख्यान

**भुसावळ ।** येथील प्रणिता प्रतिष्ठानतर्फे ३ जानेवारी रोजी रात्री पावणे आठ वाजता राष्ट्रीय किर्तनकार चारूदत्त आफळे यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी व प्रसारासाठी पोस्टर अनावरण कार्यक्रम नुकताच लक्ष्मी वेंकटेश मंदिरात संपन्न झाला. प्रसंगी लक्ष्मी वेंकटेश मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम लाहोटी, नगरसेवक किरण कोलते, वरूण इंगळे व अन्य मान्यवर उपस्थित होते. तापीनगर येथील के. नारखेडे शाळेजवळ सप्तशृंगी माता मंदीर रंगमंच प्रांगणात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून धर्मवीर संभाजी राजे यांच्या मराठा साम्राज्य पराक्रमाचा थरार व शौर्य गाथा या विषयावर हे व्याख्यान आहे.

# निंभोरा येथे पार पडला भारतीय बौद्ध महासभेचा महिला धम्म मेळावा

## वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या प्रा.अंजली आंबेडकर यांची होती प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुक्यातील निंभोरा येथे दि.२५ रोजी महिला समता सैनिक दलाचे शिबीर तर २६ रोजी भारतीय बौद्ध महासभा जळगाव पूर्व जिल्हाच्यावतीने आयोजित जिल्हास्तरीय महिला धम्म प्रशिक्षण शिबिराचा समारोप आणि महिला धम्म मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्याला प्रमुख अतिथी म्हणून वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या प्रा.अंजलीताई आंबेडकर उपस्थित होत्या.**



मेळाव्यात जिल्हाभरातून मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा.अंजलीताई आंबेडकर आणि प्रमुख मान्यवरांच्याहस्ते तथागत भगवान बुद्ध आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यानंतर सामुदायिक त्रिशरण, पंचशील घेण्यात आली.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षा प्रियंका अहिरे, स्वागताध्यक्ष सुमंगल अहिरे, राज्य संघटक लता तायडे, प्रचार आणि पर्यटन सचिव के. वाय. सुरवाडे, जिल्हा सरचिटणीस वैशाली सरदार, सुशीलकुमार हिवाळे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष शमिभा पाटील, बौद्धजन परिषदेचे अध्यक्ष एन.टी. इंगळे, जळगाव पश्चिमच्या अध्यक्ष मंगला सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**सर्वाधिक शिबीर राबवण्यात मुक्ताईनगर तालुका प्रथम**

सर्वाधिक शिबीर राबवणाऱ्या तालुक्यांमध्ये मुक्ताईनगर तालुका प्रथम, बोदवड तालुका द्वितीय तर जामनेर तालुक्याने तिसरा क्रमांक पटकावला. भुसावळ, जळगाव आणि रावेर तालुक्यांमध्येही शिबीर राबवण्यात आली होती. यावेळी सर्व कार्यकर्त्यांचे कौतुक व सत्कार करण्यात आला.

या मेळाव्याला प्रा.अंजली आंबेडकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा.अंजली आंबेडकर यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात सांगितले की, भारतीय राज्यघटनेने आणि धम्माने महिला व पुरुष यांना समान अधिकार दिले आहेत. त्याप्रमाणे दोघांनाही एकसमान पातळीवर मोजले पाहिजे. महिलांनी आता कोणत्याही क्षेत्रात मागे राहू नये, असे आवाहन त्यांनी उपस्थित महिलांना केले.

**शिबिरातील प्रशिक्षक आणि केंद्रीय शिक्षिका**

समता सैनिक दलाच्या महिला प्रशिक्षक लेफ्टनंट कर्नल मीना झिने (जालना) आणि लेफ्टनंट कर्नल रमेश साळवे तसेच विविध तालुक्यांतील महिला धम्म प्रशिक्षण शिबिरांना मार्गदर्शन करणाऱ्या केंद्रीय शिक्षिका करुणा नरवाडे (फुलगाव), वैशाली सरदार (कपिलनगर), ज्योती कुंटे (निंभोरा), सीमा अहिरे (फेकरी), प्रियंका अहिरे (पंचशील नगर, भुसावळ), सुमित्रा सर्वटकर (खडका), लता तायडे (यावल), उषा शिरसाठ (जामनेर) यांचा सन्मान करण्यात आला. या मेळाव्याने महिलांना धम्म, समता आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने प्रेरित केले असून या मेळाव्याला सर्व महिला व पुरुष जिल्हा, तालुका व शहर पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये सुमित्रा सर्वटकर, सुनीता वानखेडे, करुणा नरवाडे, सुषमा इंगळे, आशा पोहेकर, छाया सुरवाडे, कविता सुरवाडे, विद्या झनके, वनिता साळवे, वनमाला हिवाळे, सिंधू निकम, रंजू ठाकरे, भारती तायडे, ललिता बोदडे, प्रज्ञा वाघ, वसुंधरा मेढे, कुसुम गायकवाड, अनिता सपकाळे, संजीवकुमार साळवे, प्रकाश सरदार, पंडित सपकाळे शैलेंद्र जाधव, संघरत्न दामोदरे, भिमराव पवार, वसंत लोखंडे, सुनील अढागडे, प्रमोद पोहेकर, डॉ.सचिन नरवाडे, सुभाष सपकाळे, ए.टी. सुरडकर, उत्तम सुरवाडे, उत्तम खराटे, विजय अवसरमल, बी.एस. पवार, सुदान करणकाळ, दिलीप पोहेकर, बी.के.बोदडे, चंद्रकांत वाघ, जयपाल लोखंडे, ले.कर्नल युवराज नरवाडे, प्रवीण डांगे, अरुण तायडे इत्यादी प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माता रमाई ग्रुप, बौद्धजन परिषद, त्रिरत्न बुद्ध विहार, निंभोरा चंदा खंडारे, ऊषा सुरवाडे, वैशाली जाधव, प्रज्ञा मेश्राम, रंजना तांबे, प्रज्ञा खंडारे, लीला चतुर, माया बोदडे, संगीता नरवाडे, रत्नमाला जमदाडे, रमेश खंडारे, प्रकाश तायडे, अजय वाघ, बंटी सरदार, प्रणव मेश्राम, तरुण गवई, निखिल मेश्राम, निखिल नरवाडे यांनी केले.

मेळाव्याचे प्रास्तविक जिल्हा सरचिटणीस वैशाली सरदार यांनी तर सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस सुशीलकुमार हिवाळे यांनी केले. आभार संजीवकुमार साळवे यांनी मानले.

**सर्व प्रथम भंतेजीच सरदार परिवाराकडून पुष्प वर्षाव करून स्वागत केले. त्यानंतर महिला जिल्हा अध्यक्ष प्रियंका अहिरे यांचे स्वागत भुसावळ तालुका कार्यकारणी यांनी केला. प्रा. अंजली आंबेडकर यांचे स्वागत जळगाव जिल्हा महिला व पुरुष यांनी भव्य स्वागत केले, उर्वरित सर्व उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. २०२५ मधील उत्कृष्ट कामगिरी सर्व धम्म सेवक याचा सन्मान या मेळाव्यात करण्यात आला. तसेच २०२५ या वर्षभरात महिला उपासिका आणि समता सैनिक दल शिबिर राबवणाऱ्या तालुक्यांतील महिला व पुरुष कार्यकर्त्यांचा प्रा. अंजली आंबेडकर यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.**

# टोळी येथे व्ही.बी–जी राम जी जनजागृतीबाबत ग्रामसभा

प्रतिनिधी । पारोळा

भारत सरकारने सन दोन हजार पाचमध्ये नरेगा कायद्या सुरु केलेला होता त्यानुसार देशातील ग्रामीण भागातील मजुरांना कामांनुसार वेतन दिले जात होते, नरेगा कायद्यात बदल करून डिसेंबर दोन हजार पंचवीसमध्ये केंद्र सरकारने नविन व्ही. बी जी. राम, जी. अधिनियमानुसार देशात योजनेचे नाव बदल केलेले आहे आणि कामांच्या कार्यपद्धतीत सुद्धा मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसुन येत आहे.

योजनेची राज्यात पारदर्शकपणे अमंलबजावणी व्हावी यासाठी टोळी ग्रामपंचायत कार्यालय येथे सव्विस डिसेंबर दोन हजार पंचवीस रोजी विकसित भारत – रोजगार व आजीविका हमी (ग्रामीण) अर्थात व्ही, बी– जी राम जी अधिनियम अंतर्गत जनजागृती करणेबाबत वरिष्ठ अधिकारी यांच्या पत्रानुसार विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आलेले होते, त्यानुसार विशेष ग्रामसभा घेण्यात आली. या विशेष ग्रामसभेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील पात्र अनुसुचित जाती, जमाती, दुर्बल भागातील कुटुंब आणि दारिद्र्ये रेषेखालील कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हावा आणि त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन विकास व्हावा, यासाठी केंद्र सरकार मार्फत महत्वपूर्ण कायद्या आहे. यानुसार ग्रा. रो. सहाय्यक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी नविन कायद्याची बदलत्या स्वरुपात अमंलबजावणी विषयी थोडक्यात जॉबकार्ड धारक मजुरांशी चर्चा करून मार्गदर्शन केले.

# आता १० तास आधी तिकीट ‘कन्फर्म’

प्रतिनिधी । भुसावळ

**प्रवासाच्या शेवटच्या क्षणापर्यंत तिकीट मकन्फर्मफहोईल की नाही, या चिंतेत असलेल्या प्रवाशांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. रेल्वेगाडी रवाना होण्याच्या अवघ्या आठ तास आधी तयार होणाऱ्या आरक्षण चार्ट आता दहा तास आधीच तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही नवी व्यवस्था ३० डिसेंबर २०२५ पासून अंमलात येणार आहे.**




मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागामार्फत सर्व प्रवाशांना याबाबत सूचित करण्यात आले असून, ही सुधारणा प्रवाशांच्या सोयीसाठी व पारदर्शकतेसाठी करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. आजवर चार्ट उशिरा तयार होत असल्याने अनेक प्रवाशांना प्रवासाचे नियोजन करणे अवघड जात होते. कुटुंबासह प्रवास करणारे, दूरवरून येणारे प्रवासी, तसेच वयोवृद्ध व आजारी प्रवाशांसाठी ही स्थिती मानसिक ताण देणारी ठरत होती. आता मात्र दहा तास आधीच आरक्षण स्थिती स्पष्ट झाल्याने प्रवाशांना निर्धास्तपणे तयारी करता येणार आहे.

मरिमोट लोकेशनवरीलफ आरक्षण केंद्रांसाठी मॅन्युअल प्रथम चार्ट तयार करण्याचे वेळापत्रकही निश्चित करण्यात आले आहे. गाड्यांचे प्रस्थान वेळ सकाळी ५:०१ ते दुपारी २ दरम्यान असल्यास, प्रथम आरक्षण चार्ट मागील दिवशी रात्री ८ वाजेपर्यंत तयार करण्यात येईल.दुपारी २:०१ ते रात्री ११:५९ या वेळेत प्रस्थान असलेल्या गाड्यांसाठी चार्ट प्रस्थानाच्च्या दहा तास आधी, तसेच रात्री १२ ते पहाटे ५:०० दरम्यान सुटणाऱ्या गाड्यांसाठीही चार्ट दहा तास आधीच तयार करण्यात येणार आहे. दुसऱ्या आरक्षण चार्टच्या विद्यमान नियमांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. रेल्वेचा हा निर्णय म्हणजे केवळ प्रशासकीय बदल नसून, प्रवाशांच्या वेळेचा आणि विश्वासाचा सन्मान करणारे पाऊल असल्याचे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी केली ऐतिहासिक स्थळांची प्रत्यक्ष पाहणी



प्रतिनिधी । मुक्ताईनगर

विद्यार्थ्यांना ऐतिहासिक भौगोलिक स्थळांची माहिती व ओळख व्हावी यासाठी शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते तसाच अनुभव मुक्ताईनगर येथील जे स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घेतला या विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक गड किल्ले सर करून ऐतिहासिक व भौगोलिक स्थळांची प्रत्यक्ष पाहणी केली. ही शैक्षणिक सहल अतिशय आनंददायी वातावरणात संपन्न झाली.

मुक्ताईनगर तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित जे.ई. स्कूलची दि.२१ डिसेंबर ते २४ डिसेंबर पर्यंत शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. मोरगाव, जेजुरी, नारायणपूर, प्रति बालाजी, आळंदी, लेण्याद्री, शिवनेरी, ओझर, शिर्डी या ठिकाणी नेण्याचे आयोजिले होते. विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल, संस्कृती व कला यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा. या हेतूने नियोजन करून राबविण्यात आली. ऐतिहासिक व सांस्कृतिक ठिकाणांना भेट देण्यात आली. सहलीच्या बसचे पूजन मुख्याध्यापक व्ही.एम. चौधरी यांच्या उपस्थितीत करून रवाना झाली. शैक्षणिक सहलीसाठी बी.पी. लोखंडे, आर.एन.बढे, एस.एस. धनके, ए.डी. भोळे यांनी सहकार्य करून सहल यशस्वीपणे पार पाडली. तर एस.टी. महामंडळाचे चालक एस.पी. नारखेडे यांनी सुरक्षित व शिस्तबद्ध वाहतूक सेवा पुरवली.

# बजरंग दलाचे आज शौर्य संचलन

प्रतिनिधी । अमळनेर

विश्व हिंदू परिषद बजरंग दल–अमळनेर प्रखंड यांच्या वतीने बजरंग दलाचे पहिले शौर्य संचलन रविवार दि. २८ रोजी अमळनेर शहरात आयोजित करण्यात आले आहे. यावेळी ह.भ.प. सुरेश महाराज सारवेकर (धरणगाव) यांची विशेष उपस्थिती तर प्रमुख वक्ते म्हणून कृष्णाजी देशमुख (देवगिरी प्रांत बजरंग दल पालक–नांदेड) यांची उपस्थिती लाभणार आहे. रविवार दि.२८ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता म्हस्कर प्लॉट येथून पथ संचलनास प्रारंभ होऊन सुभाष चौक, तिरंगा चौक, महाराणा प्रताप चौक, रेल्वे स्टेशन, स्वामीनारायण मंदिर येथे समारोप होईल. तरी सर्व स्वाभिमानी राष्ट्रभक्त हिंदू तरुणांनी अवश्य उपस्थित रहावे.

# एक लाखाच्या बदल्यात दहा लाखांचे आमिष, लालगोटा येथील तिघांना अटक

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**एक लाख रुपयांच्या बदल्यात दहा लाख रुपये देण्याचे आमिष दाखवत लुबाडणाऱ्या टोळीचा मुक्ताईनगर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी लालगोटा, ता. मुक्ताईनगर येथील महिलेसह तीन जणांना अटक करण्यात आली आहे.**



शिवकुमार शमी भोसले, देवकुमार शिवराज भोसले आणि सुचिता ऊर्फ सुजाता शिवकुमार भोसले अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. मुक्ताईनगर पोलिस ठाण्यातंर्गत मधापुरी, लाल गोटा, हलखेडा, जौंधनखेडा, चारठाणा अशा गावांमध्ये काही गुन्हेगार वृत्तीच्या लोकांनी एक लाख रुपयांच्या मोबदल्यात दहा लाख रुपये देण्याचे आर्थिक प्रलोभन देणे, सोन्याची नाणी, काळी हळद देणे, नागमणी देण्याचे प्रलोभन देणारे व्हिडिओ प्रसारित केले होते. या प्रलोभनाला बळी पडून अनेक नागरिक मुक्ताईनगर तालुक्यात येतात व त्यांना मारहाण करून त्यांच्याकडून रोख रक्कम व साहित्य लुटण्याचा प्रकार हा सर्रास मुक्ताईनगर तालुक्यात सुरू आहे. असा एक व्हीडिओ २५ डिसेंबरला प्रसारित करण्यात आला होता. त्यामध्ये एक लाख का दस लाख मिलेगा जिसको खरीदना है वही कॉल कीजिए!, असे प्रलोभन दाखवण्यात आले. मुक्ताईनगर पोलिसांनी आरोपींचा माग घेतला त्यामध्ये वरील तीन जणांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून लहान मुलांच्या खेळण्यातील नोटा, तसेच काही मोबाईल जप्त करण्यात आले. याप्रकरणी मुक्ताईनगर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलिस करत आहेत.

# शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत दीड लाखाचा कापूस जाळून खाक नुकसान

## • मुक्ताईनगर तालुक्यातील निमखेडी खुर्द येथील घटना

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

तालुक्यातील निमखेडी खुर्द येथे एका घराला शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत घरात साठवून ठेवलेला सुमारे १७ क्किंटल कापूस आणि सागवानी दरवाजा जळून खाक झाला असून, शेतकऱ्याचे अंदाजे १ लाख ४६ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

निमखेडी खुर्द येथील रहिवासी बाबुलाल नथ्थू डहाके (वय ५२) यांच्या घरात ही घटना घडली. २५ डिसेंबर रोजी दुपारी १२:३० वाजेच्या सुमारास घरातील विद्युत उपकरणात अचानक



(फोटो सोर्स-इंटरनेट)

शॉर्ट सर्किट झाले. यातून ठिणग्या उडून घरात साठवलेल्या कापसाने पेट घेतला. काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केल्याने संपूर्ण कापूस आणि घराचा मौल्यवान सागवानी दरवाजा आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.

बाबुलाल डहाके यांनी आपल्या शेतातील उत्पादित केलेला १७ क्किंटल कापूस घरात विक्रीसाठी साठवून ठेवला होता. या आगीत कापसासह सागवानी दरवाजाचे मिळून एकूण १ लाख ४६ हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचे पोलीस तक्रारीत नमूद केले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

या प्रकरणी मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात अकस्मात आगीची नोंद करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल अजय खंडेराव या घटनेचा अधिक तपास करत आहेत. ऐन कापूस विक्रीच्या हंगामात शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**• घरातील विद्युत उपकरणात अचानक शॉर्ट सर्किट झाले. यातून ठिणग्या उडून घरात साठवलेल्या कापसाने पेट घेतला. आगीत कापसासह सागवानी दरवाजे खाक झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.**

# पोस्ट एजंटची बॅग कापून ५० हजारांची रोकड लांबविली

प्रतिनिधी । चाळीसगाव

शहरात पोस्ट एजंटाने पोस्ट कार्यालयातून ५० हजारांची रोकड काढली व ग्राहकाला देण्यासाठी दुचाकीवरून जात असतांना चोरट्याने हात की सफाई दाखवत बॅगेला तिक्ष्ण हत्याराने कट मारून ५० हजार रूपयांवर डल्ला मारला. याप्रकरणी चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पुरुषोतम श्रीधर वाणी रा. लक्ष्मीनगर, चाळीसगाव हे पोस्टात एजंट म्हणून काम करतात, बुधवार २४ डिसेंबर रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास त्यांनी येथील मुख्य पोस्ट कार्यालयातून चेक वटवून ५० हजार रूपये काढले. हे पैसे बॅगेत ठेवून ते स्कुटीने स्टेशन रोडवरील एका ग्राहकाकडे पैसे देण्यासाठी गेले. तेथे बॅग उघडून पैसे पाहीले तर दिसून आले नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने दुपारी २.३० ते ३.१० वाजेच्या दरम्यान पोस्ट ऑफीस ते विक्की पार्लर स्टेशन रोड पर्यंत बॅगेतील ५० हजारांची रोकड बॅगेला तिक्ष्ण हत्याराने कट मारून कापून फिर्यादीवरून चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनला अज्ञात चोरून नेल्याचा प्रकार समोर आला आहे.